# GONDWANA UNIVERSITY, GADCHIROLI

(Established by Government of Maharashtra Notification No. MISC -2007/(322/07) UNI -4 Dated 27th Sept. 2011 State University Governed by Maharashtra University Act, 1994 )

## National Service Scheme

**Dr.I.S. Mohurley**
**Programme Coordinator**
Mobile: 7774027661, 9422893555

MIDC Road, Complex, GADCHIROLI – 442 605 (M.S)
web: unigug.org/ gondwana.digitaluniversity.ac
**Email :** director.studentwelfaregug@ gmail.com


**पत्र क्र. No.GU/NSS/ 193 /2015** **Dt: 01/02/2015**

प्रति,

१. मा. प्राचार्य, कला व वाणिज्य महाविद्यालय, भिसी जि. चंद्रपूर
२. मा. प्राचार्य, राष्ट्रसंत तुकडोजी महाविद्यालय, चिमूर जि. चंद्रपूर
३. मा. प्राचार्य, ग्रामगीता महाविद्यालय, चिमूर जि. चंद्रपूर
४. मा. प्राचार्य, शासकिय अभियांत्रीकी महाविद्यालय, जि. चंद्रपूर
५. मा. प्राचार्य, कर्मवीर दादासाहेब देवतळे महाविद्यालय, चामोर्शी जि. गडचिरोली.

**विषयः- सन २०१५-२०१६ मधील 'उत्कर्ष-२०१५' सामाजिक सांस्कृतिक स्पर्धामध्ये निवड करण्यात आलेले विद्यार्थी.**

महोदय,

उपरोक्त विषयान्वये आपणास कळविण्यात येत आहे की, दि. ०५ ते ०७ फेब्रुवारी, २०१६ दरम्यान महात्मा फुले कृषी विद्यापीठ, राहुरी येथे 'उत्कर्ष-२०१५' या सामाजिक सांस्कृतिक स्पर्धांचे आयोजन करण्यात आले आहे. यात आपल्या महाविद्यालयातील संलग्नित यादीनुसार विद्यार्थ्यांची विद्यापीठ संघामध्ये निवड करण्यात आली आहे.

निवड झालेल्या स्वयंसेवकांसोबत **प्रा. डॉ. नत्थु गिरडे, (मो.क्र. ९४०४५७२५३२ )** कला व वाणिज्य महाविद्यालय भिसी ता. चिमूर, जि. चंद्रपूर हे संघनायक म्हणुन जाणार आहेत. दि. ०४ फेब्रुवारी, २०१६ रोजी निवड झालेल्या स्वयंसेवकांनी सकाळी ११.०० वाजेपर्यंत रविनगर नागपूर येथे पोहचावयाचे आहे. तेथूनच राहुरीकरिता सैनी ट्रॅव्हल्सची बस ठिक सकाळी ११.३० वाजता जाणार आहे, याची नोंद घ्यावी आणि 'उत्कर्ष' ही राज्यस्तरीय असल्यामुळे संबंधीत कार्यक्रम अधिकाऱ्यांनी त्यादृष्टीने विद्यार्थ्यांची तयारी करवून घ्यावी.

धन्यवाद!

(डॉ. ईश्वर श्रा. मोहुर्ले)
कार्यक्रम समन्वयक
राष्ट्रीय सेवा योजना

कार्यक्रम समन्वयक
राष्ट्रीय सेवा योजना विभाग
गोंडवाना विद्यापीठ,गडचिरोली

संलग्नः

१. प्रवेशिका
२. नियमावली
३. स्पर्धेची रुपरेषा

# स्पर्धेची नियम व नियमावली

**सर्वसाधारण नियम:**

१. सहभागी विद्यार्थ्यास राष्ट्रीय सेवा योजनेची उद्दिष्टे माहीत असावीत.

२. प्रत्येक स्वयंसेवक राष्ट्रीय सेवा योजनेअंतर्गत नोंदणीकृत असणे बंधनकारक राहील व त्याचे वय स्पर्धेदरम्यान २५ वर्षे पूर्ण नसावे.

३. विद्यार्थी आरोग्यदृष्ट्या सक्षम असेल याची खात्री करावी व सोबत डॉक्टरांनी प्रमाणित कलेले प्रमाणपत्र असावे.

४. विद्यार्थ्यास पालक तसेच प्राचार्यांच्या सही शिक्क्यासह सोबत जोडलेल्या नमुन्याप्रमाणे संमतीपत्र जोडणे बंधनकारक राहील.

५. स्पर्धेसाठी कोणतेही प्रवेश मूल्य आकारले जाणार नाही.

६. सहभागी विद्यार्थ्यांचा प्रवासखर्च महाविद्यालयाच्या प्रशासकीय खर्चातून करण्यात यावा.

७. प्रत्येक विद्यार्थ्याने महाविद्यालयाचे ओळखपत्र सोबत ठेवावे.

८. राष्ट्रीय स्तरावरील युवा महोत्सव सांस्कृतिक स्पर्धेत सहभागी होणाऱ्या विद्यार्थ्यांनी उत्कर्ष या स्पर्धेत सहभागी होऊ नये.

९. ही स्पर्धा फक्त राष्ट्रीय सेवा योजना स्वयंसेवकांसाठी असेल.

कार्यक्रम समन्वयक
राष्ट्रीय सेवा योजना विभाग
गोंडवाना विद्यापीठ,गडचिरोली

.................

(४)

# महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी

राष्ट्रीय सेवा योजना, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, महाराष्ट्र शासन
आणि
राष्ट्रीय सेवा योजना विभाग, महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी
यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित
८वी राज्यस्तरीय सामाजिक-सांस्कृतिक स्पर्धा उत्कर्ष - २०१५-१६
(दिनांकः ०५ ते ०७फेब्रुवारी २०१६)
स्थळः - डॉ. नानासाहेब पवार सभागृह, मफुकृवि राहुरी

## स्पर्धेची सर्वसाधारण रुपरेषा

- विविध विद्यापीठांच्या संघाचे आगमन दिनांक ०४.०२.२०१६ रोजी सायंकाळी ०५.०० वाजेपर्यंत स्पर्धेच्या ठिकाणी अपेक्षित व दिनांक ०४.०२.२०१६ रोजी रात्री ०९.०० वा. विद्यापीठांच्या संघनायकांची नियोजन बैठक
- शुक्रवार दिनांक ०५ फेब्रुवारी २०१६
  - सकाळी ०८.०० ते ०९.०० : अल्पोपहार व चहा
  - सकाळी ०९.०० ते ११.०० : पथसंचलन (शोभायात्रा)
  - सकाळी ११.०० ते दुपारी ०१.३० : उद्घाटन सोहळा
  - दुपारी ०१.३० ते ०१.४० : भित्तीचित्र व स्वरुपातील कार्यप्रसिध्दी अहवाल प्रदर्शन
  - दुपारी ०१.४० ते ०२.४० : भोजन
  - दुपारी ०२.४० ते ०४.३० : वक्तृत्व स्पर्धा
  - दुपारी ०४.३० ते ०५.३० : माहिती पट (फिल्म)
  - सायंकाळी ०५.३० ते ०७.३० : संकल्पना नृत्य
  - सायंकाळी ०८.०० ते ०९.०० : भोजन
  - रात्री ०९.०० : विद्यापीठांच्या संघनायकांची नियोजन बैठक
- शनिवार दिनांक ०६ फेब्रुवारी २०१६
  - सकाळी ०७.०० ते ०८.०० : अल्पोपहार व चहा
  - सकाळी ०८.०० ते ०९.०० : निबंध स्पर्धा व भित्तीचित्र स्पर्धा
  - सकाळी ०९.०० ते ११.३० : पथनाटय सादरीकरण
  - सकाळी ११.३० ते दुपारी ०१.३० : कविता
  - दुपारी ०१.३० ते ०२.३० : भोजन
  - दुपारी ०२.३० ते सायंकाळी ०४.३० : भारतीय लोककला (पोवाडा, भारुड, भजन इ.)
  - सायंकाळी ०४.३० ते ०६.०० : भारतीय लोकवाद्य
  - सायंकाळी ०६.०० ते रात्री ०८.०० : समूह गीत
  - रात्री ०८.०० ते ०९.०० : भोजन
  - रात्री ०९.०० : विद्यापीठाच्या संघनायकांची नियोजन बैठक
- रविवार दिनांक ०७ फेब्रुवारी २०१६
  - सकाळी ०८.०० ते ०९.०० : अल्पोपहार व चहा
  - सकाळी ०९.०० ते १०.३० : छायाचित्रण स्पर्धा
  - सकाळी ११.०० ते दुपारी ०१.३० : पारितोषिक वितरण सभारंभ
  - दुपारी ०१.३० ते ०२.३० : भोजन

**प्रा. शरद पाटील**
कार्यक्रम समन्वयक, रासेयो

# महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी

राष्ट्रीय सेवा योजना, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, महाराष्ट्र शासन

आणि

राष्ट्रीय सेवा योजना विभाग, महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी

यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित

८वी राज्यस्तरीय सामाजिक-सांस्कृतिक स्पर्धा उत्कर्ष - २०१५-१६

(दिनांक: ०५ ते ०७फेब्रुवारी २०१६)

स्थळ: - डॉ. नानासाहेब पवार सभागृह, मफुकृवि राहुरी

## नियमावली

१. प्रत्येक विद्यापीठ राष्ट्रीय सेवा योजनेअंतर्गत उत्कृष्ट स्वयंसेवकाची निवड चाचणीद्वारे संघ तयार करतील.
२. संघ संख्या १९ असेल, त्यात ९ स्वयंसेवक व ९ स्वयंसेविका व १ कार्यक्रमाधिकारी यांचा समावेश असेल.
३. सहभागी संघास राष्ट्रीय सेवा योजनेची उद्दिष्टे माहित असावीत.
४. संघातील प्रत्येक स्वयंसेवक राष्ट्रीय सेवा योजनेअंतर्गत नोंदणीकृत असणे बंधनकारक राहील व त्याचे वय स्पर्धेदरम्यान २५ वर्ष पुर्ण नसावे.
५. संघ पात्रतेची पूर्ण जबाबदारी संबंधित कार्यक्रम समन्वयक यांच्यावर राहील.
६. सहभागी संघ आरोग्यदृष्टया सक्षम असेल याची खात्री करावी व सोबत डॉक्टरांनी प्रमाणित केलेले प्रमाणपत्र असावे.
७. सहभागी संघातील प्रत्येक स्पर्धकास पालक व प्राचार्यांच्या सही शिक्यासह सोबत जोडलेल्या नमुन्याप्रमाणे संमतीपत्र जोडणे बंधनकारक राहील.
८. परीक्षकांनी दिलेले निर्णय सर्वांना बंधनकारक राहतील.
९. स्पर्धेसाठी कोणतेही प्रवेश शुल्क आकारले जाणार नाही.
१०. सहभागी स्पर्धकांचा प्रवासखर्च विद्यापीठाने / महाविद्यालयाने प्रशासकीय खर्चातून करावा.
११. प्रत्येक स्पर्धकाचे महाविद्यालयीन ओळखपत्र सोबत असावे.
१२. राष्ट्रीय स्तरावरील सांस्कृतिक स्पर्धेत सहभागी होणाऱ्या विद्यार्थ्यांनी स्पर्धेत सहभागी होऊ नये.
१३. ही स्पर्धा फक्त राष्ट्रीय सेवा योजना स्वयंसेवकासाठी असेल.

**उत्कर्ष राज्यस्तरीय सामाजिक-सांस्कृतिक स्पर्धा सहा विभागात घेतली जाईल: -**

### १) नृत्य (DANCE)

### संकल्पना नृत्य : (CREATIVE DANCE)

१) यामध्ये एका कलाकारांचा सहभाग असेल व कलाकृती सादर करताना ३ साथीदार सोबत असतील.
२) सहभागी कलाकार नृत्यातून आविष्कार सादर करेल, इतर साथीदार संगीत, संवाद व गाणे या माध्यमातून त्याला साथ देतील.
३) नृत्याचा कालावधी जास्तीत जास्त ७ मिनिटे असेल व ५ मिनिटानंतर सूचक घंटा वाजविली जाईल. (सादरीकरणाची किमान वेळ ५ मिनिटे असले.)
४) संकल्पना नृत्याच्या माध्यमातून राष्ट्रीय सेवा योजनेच्या संकल्पनेवर आधारित विषयाचा संदेश प्राप्त होणे अपेक्षित आहे

## २) नाटय (THEATRE)

पथनाटय :

१) या नाटयप्रकारात पथनाटय सादर केले जाईल.
२) पथनाटयामध्ये ४ ते ९ स्पर्धक भाग घेतील व त्यात साथीदार समाविष्ट असतील.
३) पथनाटयाचा कालावधी १० मिनिटे असेल व ८ मिनिटानंतर सूचक घंटा वाजविण्यात येईल.
४) पथनाटयामध्ये संहिता स्वयंसेवकांनी लिहिलेली असल्यास त्यास विशेष प्राधान्य दिले जाईल.
५) पथनाटयामध्ये लेखी संहिता, संगीत, संवाद, दिग्दर्शकाचे नाव स्पर्धेपूर्वी आयोजक विद्यापीठास सादर करणे बंधनकारक राहील.
६) या प्रकारात ध्वनी क्षेपकांचा वापर अपेक्षित नाही.

## ३) संगीत (MUSIC)

**अ) समूहगीत :**

१) संगीत विभागात समूहगीत सादर केले जाईल.
२) या स्पर्धेत ६ कलाकार सहभाग घेतील व ३ साथीदार साथ देतील.
३) समूहगीत सादरीकरणाचा कालावधी १० मिनिटे असेल व त्यात सलग २ गीत सादर करणे अपेक्षित आहे.
४) त्यात १ लोकगीत (Folk Song) व दुसरे देशभक्तीपर (Patriotic) गीत असेल.
५) चित्रपटात सादर झालेले गीत स्पर्धेकरीता निवडू नये.
६) समूहगीत मराठी किंवा हिंदी भाषेत सादर करावे.

**ब) भारतीय लोकवाद्य :**

१) या स्पर्धेत एका विद्यापीठाचा एक स्पर्धक सहभाग घेऊ शकेल.
२) रंगमंचावर येणे, संगीत साहित्य लावणे इ. पूर्व तयारीसाठी ५ मिनिटे दिली जातील.
३) संगीत साथीदारांची संख्या जास्तीत जास्त २ असावी, आणि साथीदार संघातीलच सहभागी विद्यार्थी असणे बंधनकारक
४) सिनेगीतांना या कला प्रकारात सादरीकरणासाठी परवानगी नाही.
५) सादरीकरण गुणवत्ता, संगीत साथ व एकूण परिणाम यानुसार स्पर्धकास गुण दिले जाईल.
६) सादरीकरणासाठी जास्तीत जास्त १० मिनिटे दिली जातील व ८ मिनिटानंतर सूचक घंटा होईल.
७) लोकवाद्य प्रकारांची संख्या मर्यादित नाही, अधिकाधिक लोकवाद्ये हाताळता येऊ शकतील.

**क) भारतीय लोककला : पोवाडा, भारुड, भजन इत्यादी**

१) सदर स्पर्धा प्रकारात महाराष्ट्रातील लोककला परंपरेच्या माध्यमातून विविध विषयांवर समाज जागृती करण्यासाठी वापरण्यात
येणाऱ्या विविध लोककला सादर करणे अपेक्षित आहे. उदा. पोवाडा, भारुड, भजन ओव्या इ.
३) सदर स्पर्धेत १ स्पर्धक (मुलगा किंवा मुलगी) सहभाग घेतील.
३) स्पर्धेचा कालावधी १० मिनिटांचा असेल.
४) सदर स्पर्धेसाठी स्पर्धकास ०५ साथीदार/सहाय्यकांचा वापर करता येईल.

## ४) ललितकला (FINE ART)

## भित्तीचित्र (POSTER COMPETITION) घोषवाक्य (SLOGAN)

१) सदर स्पर्धेत २ स्पर्धक (१ मुलगा व १ मुलगी) सहभाग घेतील. म्हणजेच प्रत्येक विद्यापीठाच्या २ प्रवेशिका असतील.
२) स्पर्धेचा कालावधी अडीच तास असेल.

३) स्पर्धेस लागणारा कागद आयोजक विद्यापीठ उपलब्ध करेल. परंतू इतर साहित्य (उदा. रंग, ब्रश, इ.) स्पर्धक व संबंधित

विद्यापीठाने आणावयाचे आहे.

४) स्पर्धेचा विषय स्पर्धा सुरु करताना दिला जाईल.

५) भित्तीचित्राच्या मागील बाजूस स्पर्धकाचे नाव, विषय व विद्यापीठाचा कोड क्रमांक नमूद करावा.

६) भित्तीचित्रात समर्पक घोषवाक्याचा समावेश असेल.

## ५) साहित्य (LITERATURE)

### अ) निबंध स्पर्धा :

१) निबंध स्पर्धेत ०२ स्पर्धक (१ मुलगा व १ मुलगी) सहभागी होणे बंधनकारक राहील.

२) स्पर्धेचा कालावधी २ तास असेल.

३) निबंधाचे ०२ विषय संघप्रमुखाच्या बैठकीत पहिल्या दिवशी दिले जातील.

४) प्रत्येक संघाने २ स्पर्धकाची तयारी करुन एकेकाने एका विषयावर स्पर्धेच्या दिवशी व नियोजन वेळी निबंध लिहावयाचा आहे.

५) निबंधाचे माध्यम मराठी, इंग्रजी व हिंदी असेल.

**विषयः - १) वनचेतनाः - वृक्ष लागवडीमधील युवकांचा सहभाग**

**२) रस्ता सुरक्षा अभियान- युवकांचा सहभाग**

### ब) वक्तृत्व स्पर्धा :

१) वक्तृत्व स्पर्धेत ०१ स्पर्धक (मुलगा किंवा मुलगी) सहभागी होणे बंधनकारक राहील.

२) सहभागी स्पर्धकास सादरीकरणासाठी ५ मिनिटांचा कालावधी असेल व ३ मिनिटानंतर सूचक घंटा होईल.

३) स्पर्धेचा विषय संघ प्रमुखाच्या बैठकीत पहिल्या दिवशी जाहीर केला जाईल.

४) स्पर्धेदरम्यान जाहीर केलेल्या विषयावरील ठळक मुद्दे लेखी स्वरुपात पंचांना सादर करणे बंधनकारक राहील.

**विषयः - स्वच्छ भारत : काळाची गरज**

### क) कविता :

१) या स्पर्धेत २ स्पर्धक त्यात ०१ मुलगा व ०१ मुलगी सहभागी होणे बंधनकारक राहील.

२) प्रत्येक संघाने ०२ स्पर्धकाची तयारी करुन एकेकाने एका विषयावर स्पर्धेच्या दिवशी व नियोजित वेळी कविता सादर करावी.

३) कवितेचे माध्यम मराठी व हिंदी असेल.

४) सहभागी स्पर्धकास सादरीकरणासाठी ०५ मिनिटांचा कालावधी असेल व ०३ मिनिटानंतर सूचक घंटा होईल.

५) कवितेमध्ये नविन आशयाचा संदेश असावा.

## ६) छायाचित्रण स्पर्धा (PHOTOGRAPHY)

१) प्रत्येक सहभागी संघाने स्पर्धेच्या उद्घाटनापासून ते स्पर्धा संपेपर्यंतच्या कालावधीतील छायाचित्रे काढावीत.

२) त्यातून उत्कृष्ट १५ छायाचित्रे लघुमुद्रिका (सी.डी.) स्वरुपात सादर करावयाची आहे.

३) स्पर्धेसाठी लागणारा डिजीटल कॅमेरा सहभागी विद्यापीठाने आणावयाचा आहे.

४) संगणक व संबंधित सामुग्रीची व्यवस्था आयोजन विद्यापीठ करेल.

## ७) पथसंचलन :

पथसंचलन हे उद्घाटन सोहळयापूर्वी संपन्न होणे अपेक्षित आहे. उत्कर्ष ही स्पर्धा सामाजिक-सांस्कृतिक स्पर्धा असल्यामुळे सामाजिक समस्येवर आधारित रासेयो उपक्रमातील संबंधित संकल्पना देण्यात येईल. दिलेल्या विषयावर विविध प्रकारे वेशभुषा, रंगसंगती, चलचित्र, घोषवाक्य इ. माध्यमांचा वापर व्हावा. या पथसंचलनाच्या सुरुवातीला विद्यापीठाचा बॅनर असावा व त्या पाठोपाठ पथसंचालनाचा चमू असावा, विद्यापीठ अंतर्गत सहभागी सर्व

स्पर्धक पथसंचलनात भाग घेणे अपेक्षित आहे. पथसंचलनाच्या गुणांचा सर्वसाधारण विजेते पद घोषित करताना विचार केला जाणार नाही. नाविन्यपूर्ण उत्कृष्ट पथ संचलन चमूस फिरता चषक देण्यात येईल.

विषयः - **१) स्वच्छ भारत अभियान २) जलसंवर्धन**

**८) कार्य प्रसिध्द्दी अहवाल/स्पर्धा :**

२४ सप्टेंबर ते ०२ ऑक्टोबर या सप्ताहामध्ये विद्यापीठाने आयोजित केलेल्या विविध उपक्रमांवर आधारित अहवाल तयार करणे अपेक्षित असून तो अहवाल या स्पर्धेसाठी अपेक्षित आहे आणि या अहवालावर परिक्षकांमार्फत गुण तक्ता तयार करुन सर्वोत्कृष्ट कार्य प्रसिध्दी अहवालास पुरस्कार दिला जातो. या गुणांचा सर्वसाधारण विजेत्या पदासाठी विचार केला जाणार नाही.

**९) उत्कर्ष कार्य प्रसिध्द्दी अहवाल/स्पर्धा-(फ्लेक्स बॅनर) :**

१) या स्पर्धेत सहभागी विद्यार्थ्यांनी १ X १ मीटर या आकाराच्या फ्लेक्स भित्तीचित्र बनविणे अपेक्षित आहे.
२) या स्पर्धेसाठी प्रत्येक विद्यापीठांनी २ फ्लेक्स आणणे अपेक्षित आहे.

**प्रमाणपत्र व पारितोषिके :**

१) प्रत्येक विभागातील स्पर्धेस अनुसरुन प्रथम ३ उत्कृष्ट विजेत्यांना पारितोषिके दिले जातील.
२) सर्व सहभागी स्पर्धकांना सहभाग प्रमाणपत्र दिले जाईल.
३) स्पर्धेच्या प्रत्येक विभागात फिरता चषक, तसेच सर्वोत्कृष्ट संघास फिरता चषक देण्यात येईल.

**संपर्क आणि स्पर्धा स्थळ :**
स्थळः - **डॉ. नानासाहेब पवार सभागृह, मफुकृवि राहुरी**

संपर्क : प्रा.शरद विश्वनाथ पाटील रासेयो कार्यक्रम समन्वयक, **(मोबाईल क्र.९८२२३५९६६८)**
**राष्ट्रीय सेवा योजना विभाग दुरध्वनी क्र. ०२४२६-२४३२५०/ ०२४२६-२४३२७४**
प्रा. दिलीप मोघल गायकवाड - ९८२२८६८०६१
प्रा. अभिजित जयसिंग नलावडे - ९४०३६०२६४०

स्पर्धा दिनांक : **०५ ते ०७ फेब्रुवारी २०१६**

**आगमन : ०४ फेब्रुवारी २०१६ रात्री ०८.०० वाजता**
**प्रस्थान : ०७ फेब्रुवारी २०१६ सायंकाळी ०४.०० वाजता**

## अत्यंत महत्वाचे

- संघासोबत आपल्या विद्यापीठाचा ध्वज व राष्ट्रीय सेवा योजनजेचा बॅनर असावा.
- संघामधील प्रत्येक स्पर्धकाने महाविद्यालयाचे आयकार्ड, आयकार्ड साईज फोटो, एन.एस.एस बॅज, डायरी इत्यादी सोबत आणावे.
- स्पर्धेसाठी लागणारे साहित्य उदा. वाद्य, वेशभूषा, छायाचित्रणासाठी कॅमेरा, भित्तीचित्रांसाठी रंग ब्रश इ. सोबत आणावे.
- राज्य संपर्क अधिकारी यांनी सर्व विद्यापीठास पाठविण्यात आलेला **Forms: A,B,C,D,E.F,G,H,I** इत्यादी नमुन्यात व्यवस्थित माहिती भरुन त्याच्या मूळ प्रति संघनायकासोबत पाठवून स्पर्धा ठिकाणच्या नोंदणी कक्षात दि. १९ जानेवारी २०१५ रोजी सायंकाळी ०५.०० वाजेपर्यंत जमा करावेत.
- **स्पर्धेच्या सुयोग्य नियोजनासाठी उत्कर्ष प्रवेशिका (Form C ) व उत्कर्ष स्पर्धेसाठी विद्यापीठाची एकत्रित सहभाग प्रवेशिका (Form D) swompkv@gmaill.com या ई- मेल द्वारे ०१** फेब्रुवारी २०१६ **पर्यंत पाठवावे.**
- राहुरी येथे सध्या थंडीचे प्रमाण जास्त असल्याने संघात सहभागी स्पर्धकांना सोबत गरम कपडे आणण्यासंबंधी सूचना द्यावी.
- **संघनायकासोबत गतवर्षाचे फिरते चषक सुयोग्य अवस्थेत उत्कर्ष आयोजन विद्यापीठाकडे पाठविणे बंधनकारक आहे.**
- राष्ट्रीय सेवा योजना कक्ष, महाराष्ट्र शासन यांनी पाठविलेल्या उत्कर्ष नियमावलीनुसार संघाच्या परिपुर्ततेची व्यवस्था करण्याची जबाबदारी कार्यक्रम समन्वयक यांची राहील.
- **उत्कर्ष स्पर्धेच्या निमित्ताने खालील विषय निश्चित करण्यात आलेले आहे.**

| | | | |
|---|---|---|---|
| **पथसंचलन** | : | **१) स्वच्छ भारत अभियान** | **२) जलसंवर्धन** |
| **वक्तृत्व स्पर्धा** | : | ढासाळते सामाजिक आरोग्य : तरुणांची भूमिका | |
| **निबंध स्पर्धा** | : | १) स्वातंत्र्य म्हणजे स्वैराचार नव्हे | |
| | | २) शेती व्यवसाय कालबाहय झाला आहे काय ? | |

कविता व भित्तीचित्र स्पर्धेसाठीचे विषय स्पर्धा सुरु करताना देण्यात येतील याची नोंद घ्यावी.

## संमती पत्र

मी कुमार / कुमारी ------------------------------------------------

महाविद्यालयाचे नांव ----------------------------------------------

विद्यापीठाचे नांव ------------------------------------------------

उत्कर्ष - राज्यस्तरीय सामाजिक सांस्कृतिक स्पर्धा महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी येथे दिनांक ०५ ते ०७ फेब्रुवारी २०१६ या कालाधीत संपन्न होणार आहेत या स्पर्धेत मी स्वतःच्या जबाबदारीवर सहभागी होणार आहे.

घरचा पत्ता :- --------------------------------------------

--------------------------------------------------------

भ्रमणध्वनी :----------------स्पर्धकाची सही -------------------------

माझ्या पाल्य कु. -------------------------हा/ही माझा/माझी/मुलगा/मुलगी माझ्या परवानगीने सदर स्पर्धेत सहभागी होत आहे. उपरोक्त कालधीत आणि प्रवासादरम्यान काही आपत्ती घडल्यास, ती माझी जबाबदारी आहे, याची मला जाणीव आहे व त्यानुसार कोणत्याही प्रकारच्या नुकसान भरपाईचा दावा मी संबंधीत महाविद्यालय/विद्यापीठ/राज्य सरकार यांचेकडेही मागणार नाही, याची ग्वाही देतो/देते.

पालकांचे नाव व पत्ता :- --------------------------------------

--------------------------------------------------------

दुरध्वनी :- --------------------भ्रमणध्वनी :- ------------------

पालकांची सही :- ------------------------------

ठिकाण :- ------------------------------------

दिनांक :- ------------------------------------

कार्यक्रम अधिकारी सही / शिक्का कार्यक्रम समन्वयक

CERTIFICATE OF MEDICAL / PHYSICAL FITNESS

Signature of the candidate ------------------------------

I do hereby certify that I have examined

Mr./ Mrs. ______________________________

S/O/D/O ______________________________

for State level Social Cultural Competition Utkarsha – 2015-16

The candidate whose signature is given above is not suffering from any communicable or chronic disease, which my cause any hindrance in his / her participation in the above mentioned programme.

Place :- Signature of Medical Officer

Date :-